महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,रत्नागिरी

Government Medical College and Hospital, Ratnagiri

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रत्नागिरी - ४१५६१२

दुरध्वनी क्र. ०२३५२-२४४३५५ ईमेल: deangmcratnagiri@gmail.com

जा.क्र.शावैमरुर/ आस्थापना/वैद्यकीय अधिकारी / जाहिरात/ ८०५ / २०२६ दिनांक:- १०/ ०३ / २०२६

वेबसाईटव्दारे प्रसिध्द(www.gmcratnagiri.in)

## "जाहिरात"

विषय :-वैद्यकीय अधिकारी या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात संस्थास्तरावर निवड समितीमार्फत भरणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,रत्नागिरी येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपांत कंत्राटी पध्दतीने वैद्यकीय अधिकारी ही रिक्त असलेली पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्थीच्या अधीन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवारांनी अर्ज सादर करावयाचा कालावधी | दि.११/०३/२०२६ ते दि.२०/०३/२०२६ सकाळी ११.०० ते सायं.०५.०० वाजेपर्यंत ( सुट्टीचे दिवस वगळून) |
| २ | मुलाखतीचा दिनांक | दि.२४/०३/२०२६ |
| ३ | मुलाखतीचे ठिकाण | मा.अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,रत्नागिरी (परिषद हॉल) |

इच्छुक उमेदवारांनी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर (www.gmcratnagiri.in) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीसोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध (Download) करुन घ्यावा. तसेच सदरील अर्ज परिपूर्ण भरुन त्यासोबत आवश्यक ते सर्व शैक्षणिक अर्हतेचे कागदपत्र/ प्रमाणपत्राच्या छायांकित सांक्षांकित प्रती जोडाव्यात. उमेदवारांनी कार्यालयातील आवक-जावक शाखेस प्रत्यक्ष अथवा पंजीकृत डाकेने अर्ज सादर करावा व त्याबाबतची पोच घ्यावी. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करु नये. ऑनलाईन अर्ज स्वीकारला जाणार नाही. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मूळ कागदपत्रांसह व साक्षांकित केलेल्या प्रतीसह थेट मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने हजर रहावे.

### वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता अटी व शर्थी :-

१. अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी मुलाखतीच्या वेळी एम.एम.सी.रजिस्ट्रेशन असणे बंधनकारक आहे. सदरहू प्रमाणपत्र नसल्यास त्याची मुलाखत घेतली जाणार नाही.
२. नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सात(७) दिवसांच्या आत कर्तव्यावर हजर होणे क्रमप्राप्त आहे.
३. सदर पदावरील नियुक्ती ही वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे दिनांक ३१/१२/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना ठोक वेतन रुपये ७५,०००/- (अक्षरी रुपये पंच्याहत्तर हजार मात्र) इतका एकत्रित मानधन अदा करण्यात येईल.

४. सदर कंत्राटी तत्वावरील नियुक्ती ही प्रथमतः १२० दिवसांकरीता राहील योग्य यंत्रणेमार्फत उमेदवार उपलब्ध न झाल्यास अथवा १२० दिवसानंतर आपली नियुक्ती पुढे सुरु ठेवायची असल्यास आपणास प्राध्यापक व विभागप्रमुख यांचेमार्फत स्वयंस्पष्ट शिफारशीसह कार्यालयाकडे नियुक्ती संपवण्यापूर्वी १५ दिवस अगोदर पुर्ननियुक्ती बाबतचे विनंती निवेदन सादर करावे.तदनंतर आवश्यकतेनुसार पुढील १२० दिवसांकरीता नुतनीकरण करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

५. सदर पदावर कार्यरत असताना आपणास खाजगी व्यवसाय करता येणार नाही. याबाबत आपण इतर कोठेही खाजगी वैद्यकीय व्यवसाय करीत नसल्याचे रुपये १००/- चे बॉन्ड पत्रावर प्रतिज्ञापत्र लिहून देणे अनिवार्य आहे.

६. सदरील पदावरील नियुक्ती ही १२० दिवासांकरीता किंवा मा. संचालनालय, मुंबई यांच्या मार्फत बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवारांची नियुक्ती होईपर्यंत किंवा बदलीने उमेदवार प्राप्त होईपर्यंत यापैकी जे आधी घडले तोपर्यंत नियुक्ती सुरु ठेवण्यात येईल. वरीलपैकी जे आधी घडेल त्यावेळी आपली तात्पुरती नियुक्ती तात्काळ पुर्वसुचनेशिवाय समाप्त करण्यात येईल.

७. सदरील पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास किंवा सदरची सेवा सोडावयाची असल्यास एक महिना पूर्व लेखी सूचना देणे आवश्यक आहे किंवा एका महिन्याचे मानधन शासनास भरणे आवश्यक राहील.

८. पदग्रहण करण्यापूर्वी प्रजासत्ताकाशी एकनिष्ठ राहील, अशी लेखी शपथ विहीत नमून्यात द्यावी लागेल व त्याप्रमाणे नियमांचे तंतोतंत पालन करावे लागेल.

९. महाराष्ट्र नागरी सेवा नियम — २००५ अन्वये, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

१०. सदर पदावर रुजू झाल्यावर आधारकार्ड, पॅनकार्ड व बँक खाते पासबुकची प्रथम पानाची छायांकित प्रत यासर्वांची प्रत कार्यालयाच्या लेखाशाखेत द्विप्रतीत सांक्षाकित सादर करणे अनिवार्य राहील.

११. उपरोक्त अटी व शर्तीमध्ये कोणतेही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेले आहेत.

(डॉ. जयप्रकाश रामानंद)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
रत्नागिरी

प्रत:- मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर

प्रत:- मा. संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

# Government Medical College, Ratnagiri
## Application Form

Application Details :

| | |
|---|---|
| Application No. | |
| Application Date : | |

Candidate Details :

| | |
|---|---|
| Name of the post applied with subject | |
| Candidate Name | |
| Address | |
| Mobile no | |
| Email ID. | |
| Name of the organization if you are serving in private/other sector | |

Educational Details :

| Qualification | Year of passing | Name of the college | Total Marks obtained (out of) | Percentage | University |
|---|---|---|---|---|---|
| 1. S.S.C | | | | | |
| 2. H.S.C | | | | | |
| 3. Internship completion certificate | | | | | |
| 4. MBBS Degree Certificate | | | | | |
| 5. Other | | | | | |

Declaration

Information furnished in this application form is complete and correct to the best of my knowledge and any proof contrary to this will make me liable for necessary disciplinary action.

Signature of Applicant

| Sr. no. | List of documents/Certificates | Yes/No |
|---|---|---|
| 1 | Adhar and Pan Card | |
| 2 | SSC Certificate | |
| 3 | HSC Certificate | |
| 4 | Internship Completion Certificate | |
| 5 | MBBS Degree Certificate | |
| 6 | MUHS Certificate | |
| 7 | MMC Registration Certificate | |
| 8 | Attempt Certificate of all MBBS | |
| 9 | Domicile certificate issued by competent authority | |
| 10 | Self-declaration letter regarding not working in any other government institute/department | |
| 11 | Other if any | |